RNI No. MAHBIL/2009/36619

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—कोकण विभागीय पुरवणी

वर्ष ६, अंक ३९]    शुक्रवार, नोव्हेंबर १३, २०२०/कार्तिक २२, शके १९४२    [पृष्ठे २, किंमत : रुपये ११.००

### असाधारण क्रमांक ६३

### प्राधिकृत प्रकाशन

**उप विभागीय अधिकारी, माणगांव यांज कडून,**

क्रमांक-उविअमा-भूसं/कात-२/एस आर ५७/२०११—ज्याअर्थी, महाराष्ट्र औधोगिक विकास अधिनियम, १९६१ (१९६२ चा महा-तीन) चे कलम एक, पोट-कलम (३) अन्वये काढण्यात आलेली व दिनांक १९ फेब्रुवारी २००९ च्या **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र,** भाग चार ब पृष्ट क्र. २६१ ते २६६ वर प्रसिद्ध करण्यात आलेली दिनांक १९ फेब्रुवारी २००९ ची शासकीय अधिसूचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र. आयडीसी २००७/(३३४)/उ-१४ उक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे त्या अधिसूचनेच्या अनुसूचित विनिर्दीष्टी करण्यात आलेल्या क्षेत्रात फेब्रुवारी, २००९ महिन्याच्या १९ व्या दिवसापासून अंमलात येतील असा महाराष्ट्र शासनाने निर्देश दिला आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे प्रकरण ६, दिनांक १९ फेब्रुवारी २००९ च्या अधिसुचनेस, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाकडील दुरुस्तीपत्रक क्रमांक आयडीसी २०१९/(प्र.क्र.६६२)/उद्योग-१४, दिनांक १९ मार्च २०२० अन्वये मौजे-निजामपूर, ता.माणगांव, जि.रायगड, येथील प्रकरण ६ च्या अधिसुचनेतील काही सर्व्हे नंबर मधील क्षेत्रात दुरुस्ती केल्याबाबत **महाराष्ट्र शासनाच्या राजपत्रातील** भाग चार ब पृष्ठ क्रमांक २८-३१ मध्ये दिनांक १९-२५ मार्च २०२० रोजी जाहिर केले आहे ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाचे प्रकरण ६ ज्या क्षेत्रात लागू करण्यात आले आहे व त्या सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या जमिनी समाविष्ट आहेत ;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अधिनियमाचे कलम ३२ अन्वये ज्या क्षेत्रात उपरोक्त अधिनियमाचे प्रकरण ६ लागू करण्यात आले आहे. त्या क्षेत्रातील जमिनी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास औद्योगिक किंवा उपरोक्त अधिनियमाच्या उद्दिष्टांच्या पुर्ततेसाठी संपादन करण्यास अधिकार महाराष्ट्र शासनास प्रदान केले आहे ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे आयडीसी/१८९२(१७४४१) उद्योग १४, दिनांक ११ जून १९९३ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे आयडीसी/२१०६/(४८५)/उ-१४, दि. १० नोव्हेंबर २००६ अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६२ च्या नियम २८ ने जिल्हाधिकारी यांना प्रदान केलेले उपरोक्त नियमाची कलमे ३२, ३६ व ३८ चे अधिकार आणि नियमाचे कलम २(क) अन्वये उप विभागीय अधिकारी, माणगांव विभाग, माणगांव यांना कार्यान्वित करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत आणि ज्याअर्थी, सोबतच्या परिशिष्टात नमूद केलेल्या क्षेत्राची महामंडळास नियोजित **दिल्ली-मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडोर अंतर्गत दिघी पोर्ट प्रकल्प रोहा-माणगांव औद्योगिक क्षेत्रासाठी** जमिनी संपादन करण्याची जरुरी आहे, असे उप विभागीय अधिकारी, माणगांव विभाग, माणगांव यांना वाटते ;

आणि, ज्याअर्थी, महाराष्ट्र शासनाच्या उद्योग, उर्जा व कामगार विभागाचे पत्र क्र. आयडीसी २०१९/ (प्र.क्र.६६२) उद्योग १४, दिनांक ४ ऑगस्ट २०२० अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२ पोट-कलम (१) च्या तरतुदी लागू करण्याबाबत शासनाने निर्देश दिला आहे ;

आणि ज्याअर्थी, सोबतच्या अनुसूचित नमूद केलेल्या जमीन मालकांनी व हितसंबधीत असणाऱ्यांनी दाखविलेल्या कारणांचा व ज्यांनी स्वखुषीने जमिनी देण्यास लेखी स्वरुपात संमतीपत्र दाखल केलेली आहेत त्यांचा विचार करुन महाराष्ट्र विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(१) अन्वये या जमिनी संपादन करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे ;

त्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(१) चा वापर करुन अनुसूचित नमूद केलेल्या जमिनी उपरोक्त कारणासाठी संपादित केल्या असून त्याबाबत उप विभागीय अधिकारी, माणगांव विभाग, माणगांव ही नोटीस प्रसिद्ध करत आहेत.

**अनुसूची**

**रोहा-माणगांव औद्योगिक क्षेत्र**

जिल्हा रायगड, ता.माणगांव, गाव निजामपूर

| अ. क्र. | स.नं. | हि.नं. | क्षेत्र (हे.आर) |
|---|---|---|---|
| १ | ४६ | १ | १.५१० |
| २ | ४६ | २ | ०.०१८ |
| ३ | ५० | २ | १.६२९ |
| ४ | ५१ | ० | १.७२० |
| ५ | ५४ | ० | ०.८१४ |
| ६ | ५५ | १ | ०.८७० |
| ७ | ५५ | ३+४+५ | ०.९२९ |
| ८ | ६० | ० | २.०३३ |
| ९ | ६५ | ० | १.१८४ |
| १० | ६९ | ० | ०.९८१ |
| ११ | ७१ | ० | ०.०३० |
| १२ | ७७ | ० | १.५८८ |
| १३ | ८१ | ० | १.६०९ |
| १४ | ८२ | ० | १.५१८ |
| १५ | ८६ | १ | ०.७९२ |
| १६ | ८६ | २+४ | ०.६४५ |
| १७ | ८७ | २अ | १.७०२ |
| १८ | ८८ | १ | १.०८८ |
| १९ | ९० | ० | १.८११ |
| २० | ९३ | १ | २.०३६ |
| २१ | ९४ | १ | १.२६२ |
| २२ | ९४ | ३ | ०.३७९ |
| २३ | १०३ | १ | २.०३६ |
| २४ | १०३ | २ | ०.८४७ |
| २५ | १३७ | १ | ३.७४० |
| २६ | १३८ | ० | ५.४६० |
| २७ | १४० | १ | ५.६७० |
| २८ | १४१ | १ | ३.०४० |
| २९ | १४१ | ३ | ६.९७० |
| ३० | १४२ | १ | १७.९७० |
| ३१ | १४३ | ० | १४.२७० |
| ३२ | १४४ | १ | ०.४०० |
| ३३ | १४४ | २ | ६.२६० |
| ३४ | १४९ | २ब२ | ०.५०० |
| ३५ | १४९ | ५ | २.३५० |
| ३६ | १५७ | १अ | २.९४० |
| ३७ | १५७ | १ब | ३.३३० |
| ३८ | १५७ | २ | ६.६०० |
| ३९ | १९८ | २ | ०.१३७ |
| | एकूण | | १०८.६६८ |

**प्रशाली जाधव - दिघावकर,**

उप विभागीय अधिकारी,

माणगांव विभाग, माणगांव.

ठिकाण :- माणगांव,

दिनांक :- १२/११/२०२०.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.